# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३३ | बुधवार, दि.२२ ते २८ जुर्ले २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


# केंद्र सरकार विरोधात हजारो युवक रस्त्यावर,गोंदियातही एल्गार



**गोंदिया:–** नीटच्या परीक्षेच्या पेपर फुटीला घेवून गेल्या महिन्याभरापासून केंद्र सरकार विरुद्ध आंदोलने सुरू आहेत. त्यातच मागील २२ दिवसांपासून दिल्लीच्या जंतर–मंतर वर उपो–षण, आंदोलन सुरू असूनही केंद्र सरकार या आंदोलनाकडे दुर्लक्ष करीत आहे. दरम्यान (ता.२०) देशभरात निदर्शने करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला गोंदिया जिल्ह्यातील युवक, युवती व नागरिकांनी भरघोष प्रतिसाद देत आंदोलनाची धग गोंदियातही पोहचल्याचे खात्री करून दिली. केंद्र सरकारविरुद्ध हजारोच्या संख्येत निदर्शने करण्यात आली. विशेष म्हणजे आजचे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेतृत्वात करण्यात आले नाही, त्यामुळे हे आंदोलन आकर्षणाचे केंद्र ठरले होते.

केंद्र सरकारव्या कथित हुकूमशाही आणि ढिसाळ कारभाराविरोधात आज शहरासह तालुकास्तरावर तीव्र संतापाची लाट पाहायला मिळाली. ज्येष्ठ शिक्षण तज्जा व पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ गोंदिया शहरात नीट परीक्षा घोटाळा व केंद्र शासनाच्या हुकुमशाही धोरणाविरोधात भव्य आंदोलन करण्यात आले. याआंदोलनाने केंद्र सरकारच्या कारभाराचे वाभाडे काढत संपूर्ण प्रशासनाला हादरवून सोडले. येथील प्रशासकीय इमारतीसमोर आंदोलनाला सुरुवात झाली. मंडपात हजारो नागरिकांचा जनसमुदाय केंद्र सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध करण्यासाठी एकवटला होता. हुकूमशाही प्रवृत्तीला लोकशाहीचा आरसा दाखवण्यासाठी आंदोलकांनी भारताच्या संविधानाची उद्देशिका फ्रेम करून सन्मानाने मुख्यस्थानी ठेवली होती. हातात राष्ट्रध्वज आणि सोमन वांगचुक यांच्या समर्थनार्थ फलक घेऊन आंदोलकांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत, संविधानाच्या रक्षणाची शपथ घेत हे

आंदोलन शांततापूर्ण मात्र अत्यंत आक्रमक पद्धतीने पार पडले. तर केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या नाकाखाली झालेल्या परीक्षा महाघोटाळ्याविरोधात तरुणांनी आणि पालकांनी आ–पला तीव्र संताप व्यक्त केला मदेशाचा तरुण आणि विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या व्यवस्थेला इतिहास कधीच माफ करणार नाही, असा इशारा देत आंदोलकांनी केंद्र सरकारला धारेवर धरले गोंदियातून उमटलेला हा तीव्र जनक्षोभ आणि केंद्र सरकारविरोधातील हा एल्गार पाहता, आता तरी दिल्लीतील सरकार यावर काय पावले उचलणार की जनतेच्या या आक्रोशाकडे नेहमीप्रमाणे दुर्लक्ष करणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लभ लागले आहे.

**केंद्रीय व प्रशासकीय कारभाराची काढली प्रेतयात्रा !**

आंदोलनादरम्यान केंद्र सरकारच्या आणि प्रशासकीय ढिसाळ कारभाराचा तीव्र निषेध करण्यासाठी तरुणांनी एक अनोखे आणि धक्कादायक पाऊल उचलले.

प्रशासकीय मरगळीचा निषेध म्हणून आंदोलकांनी एक प्रतीकात्मक प्रेतयात्रा काढली. जमिनीवर फुलांनी सजव–लेले प्रतीकात्मक प्रेत ठेवून केंद्र सरकारच्या धोरणांचा जाहीर निषेध करण्यात आला. या प्रतीकात्मक प्रेताभोवती महिला, तरुण आणि नागरिकांनी ठिय्या मांडून सरकारविरोधात तीव्र घोषणाबाजी केली, ज्यामुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

**सर्वपक्षीय नेत्यांसह विविध संघटनांची उपस्थिती**

केंद्र सरकारच्या या जनविरोधी धोरणांविरोधात गोंदियातील जनता, विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटना एकाच छताखाली आल्याचे पाहायला मिळाले. या ऐतिहासिक आंदोलनात नगरपालिकेचे नगराध्यक्ष सचिन शेडे, उबाठाचे जिल्हाप्रमुख पंकज यादव, नगरसेवक सु–नील भालेराव, हरीश तुळसकर, योगेश अग्रवाल, विदर्भ आंदोलन समितीचे अतुल सतदेवे, नवीन दहिकर, संदीप रहांगडाले,हर्षल पवार,निलेश देशभ्रतार,ओबीसी संघटनाचे भुमेश शेंडे,निखिल बनसोड,मनोज मेंढे,कैलास भेलावे,बबलू कटरे,खेमेंद्र कटरे,सुनिल भोंगाडे यांच्यासह विद्यार्थी तसेच पालका मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## राहुल गांधींच्या नेतृत्वात खासदारांचा मोर्चा थेट पीएम हाउसवर



**दिल्ली:–** विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ काँग्रेसने सोमवारी नवी दिल्ली येथे आक्रमक भूमिका घेतली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी , प्रियांका गांधी , राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि पक्षाच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन करत घोषणाबाजी केली.

यावेळी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली.कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी काँग्रेसचे वरिष्ठ नेते मैदानात उतरले. जंतर–मंतर येथे जाण्यापूर्वी राहुल गांधींसह काँग्रेसच्या खासदारांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर धरणे आंदोलन सुरू केले. या आंदोलनात कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनीही सहभाग घेतला. आंदोलनादरम्यान धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली, तसेच सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

काँग्रेसच्या नेत्यांनी नरेंद्र मोदी, अमित शाह आणि धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. विद्यार्थ्यांवर होत असल्याचा आरोप करण्यात आलेला दडपशाहीचा निषेध करत विद्यार्थ्यांना मारहाण थांबवावी, अशा घोषणाही देण्यात आल्या. आंदोलनादरम्यान ङ्गमोदींची हुकूम शाही चालणार नाहीङ्ग, ङ्गमोदी हाय हायङ्ग आणि ङ्गअमित शाह हाय हायङ्ग अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या काँग्रेसच्या काही खासदारांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली.

**शरद पवार थेट जंतर–मंतरवर! अभिजित दीपकेंसोबत चर्चा**

**दिल्ली:–** येथील जंतर–मंतर परिसरात सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला राजकीय पाठिंबा वाढताना दिसत आहे. सोमवारी झालेल्या लाठीचार्जनंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आंदोलनस्थळी भेट देत अभिजित दिपके यांच्याशी सविस्तर चर्चा केली.




## संपादकीय

### युवा आक्रोशाचा घंटानाद आणि संवादाची कोंडी

देशाचे भविष्य मानला जाणारा तरुण जेव्हा हातात पदव्या आणि डोळ्यात अंधार घेऊन देशाच्या राजधानीत रस्त्यावर उतरतो, तेव्हा ती केवळ एका आंदोलनाची बातमी नसते, तर ते व्यवस्थेच्या अपयशाचे जिवंत लक्षण असते. काल नवी दिल्लीतील जंतरमंतरवरून संसदेकडे निघालेला युवा मोर्चा याच भयावह वास्तवाची साक्ष देत होता. लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या परीक्षा घोटाळ्यांमुळे संतापलेला हा तरुण वर्ग आता शांत बसण्यास तयार नाही, हे त्यांनी आपल्या अथांग गर्दीने आणि बुलंद घोषणांनी सिद्ध केले आहे. परंतु, या आंदोलनाकडे प्रशासनाने ज्या पद्धतीने पाहिले आणि जी कारवाई केली, ती पाहता सरकार खरोखरच लोकशाही मार्गाने चालते का, असा प्रश्न पडतो.

**दडपशाहीची परिसीमा आणि प्रशासकीय असंवेदनशीलता**

आंदोलनकर्त्या तरुणांना रोखण्यासाठी दिल्ली पोलिसांनी उभारलेली त्रिस्तरीय लोखंडी बॅरिकेडिंग, पाण्याचे प्रचंड फवारे, लाठीचार्ज आणि अश्रुधुराच्या नळकांड्यांचा केलेला अनिर्बंध वापर हा कोणत्याही लोकशाही देशासाठी भूषणावह नाही. शांततापूर्ण मार्गाने कूच करणाऱ्या निशस्त्र विद्यार्थ्यांवर पोलिसांकडून झालेल्या बळाच्या वापरामुळे अनेक तरुण जखमी झाले. इतकेच नव्हे तर आंदोलनाचे दृष्य आणि माहिती देशासमोर जाऊ नये म्हणून मध्य दिल्लीतील मोबाईल इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली. हा थेट अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आणि माहितीच्या अधिकारावर घाला आहे.याहून दुर्दैवी बाब म्हणजे, लडाखच्या हक्कांसाठी आणि तरुणांच्या रोजगारासाठी ३५ दिवसांहून अधिक काळ उपोषण करणारे विख्यात पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात ज्या प्रकारे प्रशासनाने डांबून ठेवल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे, तो प्रशासनाची असंवेदनशीलता दाखव–तो. वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली आंगमो यांनी स्वतः या आंदोलनाचे नेतृत्व करत संसदेकडे जाण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. जंतरमंतरवरील मुख्य मंच उखडून टाकून आंदोलन मोडून काढण्याचा प्रशासनाचा प्रयत्न म्हणजे 'आवाज दाबून समस्या मिटवण्याचा' अत्यंत चुकीचा पायंडा आहे.

**परीक्षांचा बाजार आणि भवितव्याची होळी**

या आंदोलनामागे केवळ राजकीय हेतू शोधणे ही सरकारची घोडचूक ठरेल.नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेतील ढिसाळ कारभारामुळे सुमारे १२ हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक पार्श्वभूमी या आंदोलनाला आहे. वर्षानुवर्षे दिवस–रात्र अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या नशिबी जर नैराश्य आणि आत्महत्या येणार असतील, तर या शिक्षण व्यवस्थेचा बाजार झाला आहे हे उघड आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची केलेली मागणी ही केवळ एका मंत्र्याविरुद्ध नसून, या सडलेल्या यंत्रणेविरुद्धचा राग आहे. कोट्यवधी रुपयांचे शुल्क भरूनही जर परीक्षांची गोपनीयता राखता येत नसेल, तर केंद्रीय शिक्षण मंत्रालय नक्की कोणासाठी काम करत आहे?

**राजकीय सोयीचे मौन आणि संवादाचा अभाव**

संसदेचे अधिवेशन सुरू होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीप्रमाणे शांतता आणि संयमाचे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला, परंतु बाहेर रस्त्यावर चाललेल्या आक्रोशावर संसदेत किंवा बाहेर थेट बोलणे टाळले. विरोधी पक्षांनी या मुद्द्यावरून संसदेत सरकारला घेरले असले, तरी हा विषय सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा राजकीय सामना नसून एका संपूर्ण पिढीच्या अस्तित्वाचा लढा आहे. आंदोलनाच्या वाढत्या दबावानंतर केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी सीजेपीच्या प्रतिनिधींची (सौरभ दास आणि आशुतोष रांका) १० मिनिटे भेट घेतली आणि मागण्यांवर चर्चा करण्याचे आश्वासन दिले. मात्र, ही भेट केवळ तात्पुरती मलमपट्टी ठरू नये.

**ठिणगीचे रूपांतर वणव्यात होण्याआधी...**

भारतातील 'जेन झी' (Gen Z) म्हणजेच आजची तरुण पिढी ही सोशल मीडियावर जितकी सक्रिय आहे, तितकीच ती आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरण्यास सक्षम आहे हे कालच्या दिल्लीतील दृश्यांनी जगाला दाखवून दिले आहे. सरकार जर तरुणांच्या या आक्रोशाला केवळ लाठ्या–काठ्यांच्या आणि बॅरिकेड्सच्या बळावर दाबून टाकण्याचा प्रयत्न करत असेल, तर तो त्यांचा गैरसमज आहे. संवादाचे दरवाजे बंद करून लोकशाही चालवता येत नाही. जंतरमंतरवर लागलेली ही ठिणगी जर योग्य वेळी शांत केली नाही आणि शिक्षण व्यवस्थेत पारदर्शक सुधारणा केल्या नाहीत, तर हा असंतोषाचा वणवा संपूर्ण देशात पसरेल. सरकारने अहंकार बाजूला ठेवून देशाच्या या अमूल्य मानवी संसाधनाला म्हणजेच युवाशक्तीला न्याय दिला पाहिजे, हीच काळाची गरज आहे.

## गोरेगावात युवकांचा एल्गार

**गोरेगाव :–** विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ तसेच शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक व अभिजित दिपके यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ शिक्षण बचाव समन्वय समितीने सोमवारी (ता. २०) येथील जुने बसस्थानक ते तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. त्यानंतर राष्ट्रपतीच्या नावे तहसीलदार प्रज्ञा बोकारे यांना निवेदन पाठविले. या मोर्चाला संविधान मैत्री संघ, युथ ग्रॅज्युएट फोरम, बहुजन सामाजिक विचार मंच गोरेगाव यांनी समर्थन देत मोर्चात सहभाग घेतला होता.

केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी यावेळी आंदोलकांनी रेटून धरली. मोर्चादरम्यान "शिक्षण मंत्री राजीनामा द्या", "सोनम वांगचुक जिंदाबाद", "अभिजित दिपके जिंदाबाद" अशा घोषणा देण्यात आल्या. वारंवार पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता, जबाबदारी आणि कडक नियंत्रण ठेवण्यात सरकारला अपयश आल्याने पेपरफुटीचे प्रकार पुढे येत आहेत, असा आरोप करीत शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.



## तिरोड्यात धरणे आंदोलन

**तिरोडा :–** सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक व अभिजित दिपके यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत शेकडो विद्यार्थी आणि सामाजिक संघटनांनी सोमवारी (ता. २०) येथील राणी अवंतीबाई चौकात धरणे आंदोलन केले.

आंदोलनादरम्यान शिक्षण क्षेत्रातील अनियमितता, भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होत असलेल्या खेळाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. "शिक्षणातील भ्रष्टाचार थांबवा, देशाचे भविष्य वाचवा", "पेपरफुटी बंद करा", "मेरिटचा अपमान मान्य नाही" आणि "युवकांचा आवाज दाबू नका" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. संपूर्ण आंदोलन शांततेत पार पडले.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# उपोषण:एक अहिंसात्मक शांती मार्ग



भारतात उपोषणाचा इतिहास जुना असून उपोषण हे अतिशय महत्त्वपूर्ण माध्यम समजले जाते.उपोषण हे आपल्या मागण्या सरकार दरबारी ठेवण्यासाठी शांततामय मार्गाने उपसलेले परिणामकारक शस्त्र आहे.उपोषण हे पूर्णपणे अहिंसात्मक मार्गाचा अवलंब करून केलेले शांतीपूर्ण आंदोलन असते.जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतःच्या शरी–राला पिडा देऊन,आत्मक्लेश करून सरकार समोर आ–पली बाजू मांडण्याचा तो एक सभ्य,संयमी आणि सुसंस्कृत प्रयत्न असतो. महात्मा गांधींनी या शस्त्राचा अतिशय चांगल्या प्रकारे उपयोग केला आणि इंग्रजासारख्या सामर्थ्यशाली शत्रूला झुकवून भारत सोडून जाण्यास भाग पाडले होते.गांधींनी उपोषणाचे हे शस्त्र अतिशय प्रभावीपणे वापरले आणि समोर शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेल्या महासत्तेला पराभूत केले.गांधींचा हा अहिंसात्मक शांतीचा मार्ग जगामध्ये खूप लोकप्रिय झाला.अनेकांनी तो स्वीकारला आणि यश सुद्धा प्राप्त केले.म्हणूनच आज महात्मा गांधी जगातील सर्वात लोकप्रिय आणि महाप्रसिद्ध महापुरुष आहेत.

भारतात स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही विविध सरकारांच्या काळात सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठमोठी उपोषणे केलेली आहेत आणि सरकारला आपल्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडले आहे.आंध्रप्रदेश मध्ये ५८ दिवसांचे उपोषण करणारे पोटी श्रीरामुलू शेवटी मरण पावले.परंतु त्यांच्या संघर्षप्रद मृत्यूनंतर केंद्र सरकारने आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती केली.एखाद्या मोठ्या माणसाने प्रामाणिक हेतूने जर उपोषण केले तर निश्चितपणे समाजाला त्याचा फायदा होत असतो.उपोषण हे सरकारी धोरणांच्या विरोधात असल्यामुळे कोणत्याही सरकारला ते परवडणारे नसते.त्यामुळे उपोषण होऊच नये असे प्रत्येक सरकारला वाटते.परंतु लोकांना उपोषण करण्याची पाळी का येते याचा सुद्धा राजकीय पक्षाच्या नेत्यांनी विचार करण्याची आवश्यकता आहे.कोणालाही उपोषण करण्याची फार हौस नसते.कारण स्वतः उपाशी रा–हून आपल्या शरीराला पीडा देणे हे फार त्रासदायक असते.जो उपोषण करतो त्यालाच त्याची जाणीव असते.त्यामुळे अपवाद वगळता बहुतांश वेळी उपोषण हे सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांसाठी केले जाते.काही वेळा प्रसिद्धीसाठी सुद्धा उपोषण केले जातात परंतु त्याचे प्रमाण कमी असते.शासन आणि प्रशासनाच्या विरुद्ध आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी उपोषण असल्यामुळे शासन–प्रशासनाने कोणत्याही उपोषणाची दखल घेणे क्रमप्राप्त असते. उपोषणकर्त्याचा जीव हा फार महत्त्वाचा असतो. त्याच्या जीवाला कोणतीही हानी पोहोचू नये याची सर्वस्वी जबाबदारी शासन– प्रशासनावर असते.त्यामुळे उपोषणकर्ता सामान्य व्यक्ती आहे की असामान्य आहे यापेक्षा तो एक माणूस आहे या दृष्टीने त्याच्याकडे पाहून त्याच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करणे हीच खरी लोकशाहीची रीत असते.

सध्या दिल्ली येथे जंतर–मंतरवर प्रसिद्ध शास्त्रज्ञ,पर्यावरण रक्षक, शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक हे उपोषणाला बसलेले आहेत.नीट परीक्षेमध्ये झालेला घोटाळा आणि लाखो विद्यार्थ्यांचे अंधकारमय झालेले भविष्य यामुळे व्यथित होऊन मागील वीस दिवसापासून त्यांचे उपोषण सुरू आहे.शिक्षण व्यवस्थेतील या ढिसाळ कारभाराबद्दल केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना दोषी ठरवून सरकारने त्यांचा राजीनामा घ्यावा आणि नीट पेपर फुटीमुळे ज्या २० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आत्महत्या केलेल्या आहे त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य करावे यासाठी सोनम वांगचुक हे काही विद्यार्थ्यांसह उपोषण करीत आहे.वेळोवेळी होणारी पेपर फुटी आणि त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली भीती आणि निराशा तसेच पालक वर्गामध्ये असलेला संताप या गोष्टी देशाचे भवितव्य असलेल्या विद्यार्थ्यांसाठी दुःखदायक आहे. रात्रंदिवस मेहनत करून आणि पालकांचा लाखो रुपयांचा चुराडा होऊन सुद्धा जर पेपर फुटत असेल,परीक्षा रद्द होत असेल, वेळेवर निकाल लागत नसेल,सतत भ्रष्टाचार होत असेल तर ही गोष्ट देशासाठी चांगली नाही.

या सर्व अव्यवस्थेविरुद्ध आवाज उठवण्यासाठी हे उपोषण सुरू आहे.शांततापूर्ण मार्गाने सुरू असलेले हे उपोषण कुठेही हिंसेचा मार्ग न अवलंबिता सरकारने निदान आमच्या मागण्या ऐकून घ्याव्यात आणि सहानुभूतीपूर्वक विचार करावा यासाठी सुरू आहे. लोकशाहीमध्ये आपल्या विरोधकांचा सुद्धा आवाज ऐकला जातो.त्यांच्याशी संवाद आणि संपर्क साधला जा–तो. परंतु सध्या चित्र मात्र पूर्ण उलट आहे.सरकार मधील कोणत्याही प्रतिनिधी एवढ्या मोठ्या शास्त्रज्ञाला भेटण्यासाठी सुद्धा जाऊ नये ही फार खेदाची बाब आहे.ज्या व्यक्तीने देशाच्या हितासाठी विशेषतः भारतीय सैन्याच्या बचावासाठी फार मोठे संशोधन केले आहे,त्याच्याबद्दल जर सरकारची इतकी अनास्था असेल आणि त्याला इतकी वाईट वागणूक मिळत असेल तर हे फार धक्कादायक आहे.त्यामुळे सरकारने अतिशय गंभीरतेने हा प्रश्न हा–ताळला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असलेली भीती दूर केली पाहिजे आणि सोनम वांगचूम यांच्या मागण्या मान्य करून त्यांचे प्राण वाचवले पाहिजे.तरच खऱ्या अर्थाने देशात लोकशाही नांदत आहे असे म्हणता येईल.

**प्रेमकुमार बोके,** अंजनगाव सुर्जी

# विकासाच्या वाटचालीत अखंड वीज पुरवठा हीच ताकद

**अर्जुनी मोरगाव:** – तालुक्यातील बाराभाटी/ब्राह्मणटोला येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वतीने उभारण्यात आलेल्या ३३ केव्ही विद्युत उपकेंद्राचे उद्घाटन आमदार राजकुमार बडोले यांच्या हस्ते १५ जुलै रोजी उत्साहात संपन्न झाले. या उपकेंद्रामुळे बाराभाटीसह परिसरातील गावांना अधिक सक्षम, दर्जेदार व अखंड वीजपुरवठा उपलब्ध होणार असून शेती, लघुउद्योग, व्यवसाय आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाला मोठा दिलासा मिळणार आहे. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ. बडोले म्हणाले यांनी ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी वीज ही मूलभूत गरज असल्याचे सांगितले.



यावेळी जि.प. सदस्य यशवंत गणवीर, कविता कापगते, माजी उपसभापती होमराज कापगते, महावितरणचे उपमुख्य कार्यकारी अभियंता पाटील, पं.स. सदस्य नाजुक कुंभरे, डोंगरवार, सरपंच चाकाटे, माजी सभापती प्रकाश गहाणे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष भोजू लोगडे, खरेदी–विक्री संघाचे संचालक लैलेश शिवणकर, कृ.उ.बा.स.चे संचालक व्यंकट खोब्रागडे, महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. बडोले म्हणाले की, शेतकर्यांना सक्षम सिंचन व्यवस्था, युवकांना उद्य–ोग–व्यवसायाच्या संधी आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. बाराभाटी येथील ३३ केव्ही उपकेंद्रामुळे परिसरातील वारंवार होणार्या कमी दाबाच्या वीजपुरवठ्याची समस्या मोठ्या प्रमाणात दूर होईल.

भविष्यातही ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा सातत्याने प्रयत्न राहील. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी नवीन उपकेंद्रामुळे परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम होणार असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर

**गोंदिया :–** अलिकडच्या कालावधीमध्ये कोकण, मुंबई व काही भागामध्ये झालेल्या मुसळ–धार पावसाच्या पार्श्वभूमीवर गणना कार्यक्रमामध्ये व्यत्यय निर्माण झाला होता. त्याअनुषंगाने मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी आयोगाने निश्चित केलेल्या कार्यक्रमामध्ये काही मुदतवाढ देण्याची विनंती केली होती. सदर विनंती मान्य करुन भारत निवडणूक आयोगाने १५ जुलै २०२६ च्या पत्रान्वये राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पु–नरीक्षण (डशिलळरश्र खपींशपीर्ळींश ठर्शींळीळेप – डखठ) कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटीची मोहीम ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

त्यानंतर १७ ऑगस्ट २०२६ (सोमवार) रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मतदारांकडून दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. तसेच १७ ऑगस्ट ते १५ ऑक्टोंबर २०२६ या कालावधीत नोटीस देणे आणि दावे व हरकती निकालात काढण्याची प्रक्रिया पार पडेल. यानंतर १९ ऑक्टोबर २०२६ (सोमवार) रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

पात्र नागरिकांनी निर्धारित कालावधीत मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी गणना प्रपत्र भरून देऊन निवडणूक प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी विजय अवधाने यांनी केले आहे.

# जि.प.सदस्य विमल बबलू कटरे यांची काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत निवड

**गोंदिया:**–अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या ओबीसी विभाग महिला शाखेतर्फे नुकतीच राष्ट्रीय कार्यकरिणींची घोषणा करण्यात आली आहे. दिनांक १९ जुलै २०२६ रोजी प्राप्त झालेल्या अधिकृत पत्रानुसार, गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व जिल्हा परिषद सदस्या विमल बबलू कटरे यांची काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकरिणीत (ओबीसी महिला विभाग) निवड करण्यात आली आहे.



त्यांच्या या निवडीमुळे गोंदिया जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून राजक्रीय व सामाजिक वतुर्ळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाराष्ट्र राज्यातून काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या समितीत ओबीसी महिला विभागातून अवघ्या दोन महिलांना स्थान मिळाले आहे. यामध्ये मंगला विलास भुजबळ आणि दुसर्या विमल बबलू कटरे यांचा समावेश आहे.

एका सामान्य पार्श्वभूमीतून आलेल्या, सतत संघर्षरत राहण्याची तयारी असलेल्या व जनसामान्य तसेच ओबीसींचे प्रश्न सातत्याने मांडणार्या कार्यकर्तीची अशी उच्च पदस्थ निवड झाल्याने कॉंग्रेस संघटनेत कार्यकर्त्यांच्या निष्ठेला आणि कष्टला योग्य सन्मान मिळत असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे. काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, महिला पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते. तसेच मोठ्या संख्येने नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**विमल कटरे यांची प्रतिक्रिया**

आपल्या निवडीबद्धल प्रतिक्रिया देताना विमल कटरे यांनी आपल्या या यशाचे श्रेय पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाला दिले आहे. त्यांनी विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी, राष्ट्रीय अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खग्गे, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. भानुदास माळी, प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले, जिल्हाध्यक्ष अमर वरहाडे यांच्यासह राष्ट्रीय व राज्यस्तरीय ज्येष्ठ नेत्यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.

# मराठी भाषा जतन आणि संवर्धनासाठी प्रभावी कृती आराखडा राबवा–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची बैठक

**मुंबई:–** प्रभावी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी; तसेच राज्य मराठी विकास संस्थेच्या कामकाजात सातत्य, पारदर्शकता आणि परिणामकारकता यावी यासाठी वर्षभरातील सर्व वैधानिक बैठकींचे वेळापत्रक आगाऊ निश्चित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे, भाषा संचालक अरुण गीते; तसेच राज्य मराठी विकास संस्थेचे अशासकीय सदस्य प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.



राज्य मराठी विकास संस्थेची सर्व वैधानिक अनुपालने पूर्ण झाल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी संस्थेचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, संस्थेचा गेल्या काही वर्षांचा प्रशासकीय व वैधानिक अन–ुशेष (बॅकलॉग) पूर्ण झाल्याने संस्थेची प्रशासकीय रचना अधिक सक्षम झाली आहे. आता मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संशोधन आणि संवर्धन यासाठी ठोस धोरणे राबविण्यावर भर देणे आवश्यक आहे. संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्नही सकारात्मक भूमिकेतून सोडविण्यात येतील.

बैठकीत सदस्यांनी मराठी भाषा आणि विविध बोलींच्या संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. मपुस्तकांचे गावफ आणि मपेटी वाचनालयफ उपक्रमांचा विस्तार करून आदिवासी व सीमावर्ती भागातील मराठी शाळांपर्यंत दर्जेदार साहित्य पोहोचविणे, झाडीबोली आणि पूर्व विदर्भातील नाट्यपरंपरेच्या जतनासाठी गडचिरोली–वडसा परिसरात नाट्य संकुल उभारणे, भारुड, गोंधळ, पोवाडा यांसारख्या लोककलांच्या माध्यमातून मराठीचा वारसा जपणे; तसेच बालसाहित्य आणि बालग्रंथालयांना प्रोत्साहन देण्याबाबत सूचना मांडल्या. या सर्व सूचनांचा सकारात्मकतेने विचार करण्यात येणार असल्याची मुख्यमंत्र्यांनी ग्वाही दिली.

तंजावर येथील मोडी लिप–ीतील सुमारे १५ लाख ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाच्या प्रगतीचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला; तसेच लंडन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या जागतिक मराठी केंद्राच्या कामालाही गती देण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

मंत्री सामंत यांनी सांगितले की, मराठी भाषेचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी ७५ आंतरराष्ट्रीय बृहन्महाराष्ट्र मंच उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज यांच्या नावाने अध्यासन केंद्र; तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्यावर पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. विविध भारतीय आणि जागतिक भाषांतील दर्जेदार साहित्य मराठीत उपलब्ध करून देण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने मअनुवाद समितीफ स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

# लाखो रुपये खर्च करूनही बाजार संकुलात कचऱ्याचे ढीग

**गोरेगाव:**–ग्रामीण भागातील अर्थकारणाला गती देण्यासाठी आणि स्थानिक व्यापारी व ग्राहकांना हक्काची जागा मिळवून देण्यासाठी शासनाच्या लाखो रुपयांच्या निधीतून तेढा गावात बाजार संकुल उभारण्यात आले. मात्र, सद्यस्थितीत या बाजार संकुलाची अवस्था अत्यंत चिंताजनक आणि दयनीय झाली आहे. पावसाने संपूर्ण परिसर दलदल झाले असून अस्वच्छता, कचऱ्याचे ढिग आणि कुंजलेल्या भाजीपालामुळे नागरिक, ग्राहक, व्यापाऱ्यांचे या ठिकाणी राहणे कठीण झाले आहे. या प्रकाराम ुळे ग्राम पंचायत प्रशासन फक्त विकासाचा देखावा करीत आहे, असा संताप गावकरी व्यक्त करु लागले आहेत. या सर्व प्रकारात लाखो रुपयांचे बाजार संकुल बेवारस अवस्थेत असल्याचे



विदारक चित्र समोर आले आहे. गोरेगाव तालुक्यातील तेढा येथे ग्राम पंचायत प्रशासनाच्या वतीने स्थानिक व्यापाऱ्यांना सोय व्हावी, याकरीता बाजार संकूल तयार केले. यातून

संकलित होणाऱ्या करातून गावविकासात हातभार लावून ग्राम पंचायतीच्या तिजोरीत भर पडणार, असे मानले जात होते. परंतु, बाजार संकुलाच्या दुरवस्था पाहून विकासाचा बोजवारा उडाल्याचे समजून येत आहे. मुख्य परिसराची पाहणी केली असता, संकुलाच्या अगदी मधोमध कचऱ्याचे मोठे ढीग साचले आहेत. जागोजागी मोठे गवत वाढले असून, सर्वत्र चिखल आणि कमालीची

अस्वच्छता पसरली आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही योग्य व्यवस्था नसल्याने संकुलाच्या आवारात पाण्याचे तळे सा–चून दलदलीसारखी भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. या अस्वच्छतेमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला असून, परिसरात दुर्गंधी पसरली आहे. बाजार संकुलाच्या आत ये–जा करण्यासाठी कोणताही सुव्यवस्थित

आणि पक्का मार्ग उपलब्ध नाही. चिखल तुडवतच व्यापारी आणि ग्राहकांना आत यावे लागत असल्याने दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. बाजार संकुलाच्या या दुरवस्थेमुळे त्रस्त झालेल्या तेढा गावातील जागरूक गावकऱ्यांनी आता ग्रा. पं. प्रशासनाला थेट धारेवर धरून संताप व्यक्त करीत आहेत.

परिसराची संपूर्ण स्वच्छता करणे, पाण्याचा निचरा करण्यासाठी नाल्यांची व्यवस्था करणे, अंतर्गत रस्ते दुरुस्त करणे आणि पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी तेढा परिसरातील जनतेकडून केली जात आहे

# विशेष लोक अदालतीमध्ये २४ प्रकरणांचा यशस्वी निपटारा

**गोंदिया :–** वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले सामोपचाराने व सामंजस्याने तात्काळ निकाली काढण्याकरीता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांचे निर्देशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.जी. वाघमारे तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एन.के. वाळके यांचे मार्गदर्शनाखाली १८ जुलै २०२६ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया येथे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत तालुका न्यायालयांमध्ये तडजोड पात्र निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत प्रलंबित प्रकरणे व पूर्व न्याय प्रविष्ठ प्रकरणाकरीता विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण २४ प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात आला.

सर्व न्यायीक अधिकारी, कर्मचारी, पक्षकार व वकील यांचे उपस्थितीत विशेष लोकअदालतीचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.जी. वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख न्यायाधीश आर.जी. वाघमारे यांनी विशेष लोकअदालतीचे फायदे व महत्व याबाबत मार्गदर्शन केले. तसेच न्यायाधीश एन.के. वाळके यांनी जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्याचे आवाहन केले.

सदर एन. आय. ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत आयोजित विशेष लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेल्या न्यायालयात प्रलंबित ९१५ प्रकरणांपैकी २४ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली व ४६,४४,४९७/– (छेच्याळीस लाख चवरेचाळीस हजार चारशे सत्याण्णव) रूपयांची वसुली झाली.

# देवरी एमआय़डीसी मध्ये १०५ जणांना भूखंड वाटप




**देवरी:–** गोंदिया जिल्ह्यातील देवरी औद्योगिक वसाहतींचा विकास केवळ कागदावरच मर्यादित राहिला असल्याचे धक्कादायक वास्तव माहिती अधिकारातून समोर आले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १०५ उद्योजक, संस्था व व्यक्तींना उद्योगासाठी भूखंड लीजवर देऊनही प्रत्यक्षात फक २६ उद्योग सुरू आहेत. उर्वरित ७९ भूखंडांवर आजतागायत एकही विट रचली गेली नसल्याने स्थानिक तरुणांच्या रोजगाराची आशा मावळली आहे.

स्थानिक उद्योजकांच्या मते, देवरी एमआय़डीसी मध्ये पाणी, वीज, रस्ते व वाहतुकीच्या अपुर्या सुविधा, बैंक कर्ज मिळण्यातील अडचणी, बाजारपेठेचा अभाव व प्रशासनाची उदासीनता यामुळे अनेकांनी भूखंड घेऊनही उद्योग सुरू केले नाहीत. काहींनी तर केवळ गुंतवणूक म्हणून भूखंड ताब्यात ठेवले आहेत.

एमआय़डीसी च्या नियमानुसार भूखंड घेतल्यानंतर ठराविक कालावधीत उद्योग सुरु करणे बंधनकारक आहे.मात्र ७९ भूखंड धारकांनी उद्योग सुरू न केल्याने त्यांचे लीज करार रद्द करून भूखंड परत घ्यावेत व नव्या उद्योजकांना द्यावेत, अशी मागणी होत आहे.

**७५ टक्के भूखंड पडून**

१०५ पैकी २६ म्हणजे केवळ २५ टक्के भूखंडांवर उद्योग सुरू आहेत. उर्वरित ७५ टक्के भूखंड धूळ खात पडले आहेत. कोट्यवधी रुपये खर्च करून पायाभूत सुविधा निर्माण केल्यानंतरही उद्योजकांनी उद्योग सुरू करण्यास स्वारस्य न दाखवल्याने MIDC परिसर ओस पडला आहे.

**स्थानिकांमध्ये नाराजी**

एमआय़डीसी आली म्हणजे आमच्या मुलांना नोकरी लागेल, असे स्वप्न दाखवले होते. प्रत्यक्षात इथे फक्त जमिनी वाटप झाल्या. उद्योगच नाहीत तर रोजगार कुठून येणार? आम्ही अजूनही मजुरीसाठी नागपूर–गोंदियाला जावे लागते,ङ्ग अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक तरुण बेरोजगारांची आहे

## जादुटोणा विरोधी कायदा जनजागृतीसाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये शिबीर आयोजित करा-विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी




**नागपूर:–** जिल्हा समाज कल्याण कार्यालय आणि कौशल्य व व्यावसायिक शिक्षण विभागांनी संयुक्तपणे नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रती महिना पाच शाळा–महाविद्यालयांमध्ये जादुटोणा विरोधी कायद्याच्या जनजागृतीसाठी शिबीर आयोजित करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज दिल्या.

श्रीमती बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीयस्तरावरील जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रमाबाबत आयोजित बैठकीत त्यांनी या सूचना दिल्या. विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, सामाजिक न्याय विभागाच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांच्यासह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जादुटोणा विरोधी कायद्याची जनजागृती करण्यासाठी विभागातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये महिन्याला पाच मोठ्या शाळा–महाविद्यालयांमध्ये जनजागृती शिबीर आयोजित करावे तसेच या शिबीरांद्वारे व्यसनमुक्ती आणि शिष्यवृत्ती संदर्भातही माहिती देण्यात यावी अशा सूचना श्रीमती बिदरी यांनी दिल्या.

या शिबीरांसाठी उत्तम प्रचार साहित्य निर्मिती करण्याचे तसेच अभ्यासू वक्त्यांचे मार्गदर्शन आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# १४ शाळांमध्ये फक्त ७५० विद्यार्थी: न.प.शाळांना पटसंख्येची घरघर

**गोंदिया–** नगर परिषदेच्या शाळांना नेहमीच कमी पटसंख्येची समस्या भेडसावत असून यंदाही परिस्थितीत कोणताही बदल दिसून आलेला नाही. शहरातील नगर परिषदेच्या १४ प्राथमिक शाळांमध्ये मिळून केवळ ७५० विद्यार्थी शिक्षण घेत आहे. त्यातील तीन मराठी शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असल्याने त्या शाळा मसलाइनवरफ असल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

शिक्षणाचा अधिकार कायदा लागू करून प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावे यासाठी शासनाकडून शासकीय शाळांमध्ये मोफत साहित्य, गणवेश व विविध सुविधा पुरविल्या जातात. या सर्व सुविधा असूनही शासकीय शाळांमध्ये अपेक्षित वाढ होताना दिसत नाही. उलट खासगी शाळांकडे पालकांचा कल मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र आहे. नगर परिषद शाळांची ही घसरण चिंताजनक ठरत असून शहरातील १४ शाळांमध्ये मिळून पटसंख्या ७५० पर्यंत मर्यादित आहे. त्यापैकी तीन शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या २० पेक्षा कमी असल्याने त्या शाळांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सर्व सुविधा उपलब्ध असूनही पालकांचा कल खासगी शाळांकडे झुकत असल्याने नगर परिषद शाळांनी पटसंख्या दिवसेंदिवस घटत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

खासगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी स्पर्धा सुरु असताना विद्यार्थी व पालकांच्या अनास्थेमुळे नगर परिषद शाळांची पटसंख्या घटत आहे, नगर परिषदेच्या १४ प्राथमिक शाळांमध्ये सध्या केवळ ७५० विद्यार्थी शिक्षण घेत आहे. यात ८ मराठी व ६ हिंदी शाळांचा समावेश आहे. काही शाळांमध्ये ३० पेक्षा कमी पटसंख्या आहे.

## फक्त दोनच शाळांमध्ये शंभरावर विद्यार्थी

**सद्यस्थितीत नगर परिषदेच्या १४ प्राथमिक शाळा सुरू असून, त्यामध्ये ८ मराठी व ६ हिंदी शाळांचा समावेश आहे. मराठी शाळांमध्ये एकूण ३८४ विद्यार्थी, तर हिंदी शाळांमध्ये ३११ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे केवळ तीन शाळांमध्येच १०० पेक्षा अधिक विद्यार्थी आहे. उर्वरित शाळांमध्ये अत्यल्प पटसंख्या असून काही शाळांमध्ये बोटावर मोजण्याइतकेच विद्यार्थी आहे. त्यामुळे नगर परिषद शाळांची एकूण स्थिती चिंताजनक असल्याचे चित्र स्पष्ट होते. यंदा निवडणुकीची व आता बीएलओची शालेय मुले शोधण्यासाठी शिक्षकांकडे वेळ मिळाला नाही. पालिकेच्या शिक्षण विभागाच्यावतीने १४ शाळा चालविल्या जात असून, २८ शिक्षक कार्यरत आहेत. दरवषी पटसंख्येत घट होत आहे. त्यामुळे यंदा सूर्याटोला येथील शाळेत केजीचे शिक्षण सुरु करण्यात आले,**

**– शिव हुकरे, न.प. गोंदिया**




**तीन शाळा बंद करण्याची वेळ प्रशासनावर**

नगर परिषद शाळांना पटसंख्येची घरघर ही नवी बाब नसून अनेक वर्षापासून हीच परिस्थिती कायम आहे. पटसंख्या घटल्याने आतापर्यंत नगर परिषदेच्या तीन शाळा बंद करण्याची वेळ प्रशासनावर आली आहे.

सिव्हिल लाइन्स परिसरातील मराठी–हिंदी प्राथमिक शाळा सन २०१४–१५ मध्ये, तर माताटोली हिंदी शाळा सन २०१९–२० मध्ये बंद करण्यात आली होती. त्यानंतरही शाळांची स्थिती सुधारलेली नाही. यंदा सूर्याटोला परिसरातील शाळा बंद करण्याचा प्रस्ताव होता. मात्र, शिक्षण विभागाने कॉन्व्हेंट पद्धतीनुसार वर्ग सुरू करून नवी संकल्पना राचवरली. सध्या येथे २० विद्यार्थी असून त्यांना केजी वन स्तराचे शिक्षण दिले जात आहे.

## मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत रोईंग व कुस्ती खेळांच्या विभागीय निवड चाचणीचे आयोजन

**गोंदिया :–** मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत रोईंग व कुस्ती खेळांच्या विभागीय निवड चाचणीचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत पुणे विभागामार्फत रोईंग व कुस्ती या खेळांसाठी विभागीय स्तरावरील निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. गोंदिया जिल्ह्यातील पात्र व इच्छुक खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी लक्ष्मीशंकर यादव यांनी केले आहे.

रोईंग निवड चाचणी २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजता क्रीडा संकुल, एमआईटी एडीटी विद्यापीठ, लोणी काळभोर, पुणे येथे होणार आहे.

# बोटे येथे रस्त्यावरील मातीमुळे दोन आठवड्यांपासून गावकरी त्रस्त

**गोरेगाव:–** तालुक्यातील ग्राम पंचायत बोटे येथे वॉर्ड क्रमांक २ आणि ३ मधील मुख्य गल्लीत सिमेंट रोडवर नाली उपसण्याचे काम करून गेल्या दोन आठवड्यांपासून खोदलेली माती रस्त्यावरच टाकून देण्यात आली आहे. या ढिसाळ कारभारामुळे येण्या–जाणाऱ्या नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून, या संदर्भात जाब विचारणाऱ्या गावकऱ्यांना सरपंचांनी थेट मुजोरीची भाषा वापरत ङ्गमला वाटेल तेव्हा काम करेन,ङ्ग असे खडेबोल सुनावल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बोटे ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वॉर्ड क्र. २ आणि ३ मधील गल्लीत सिमेंट रोडच्या बाजूला नाली खोदण्याचे काम दोन आठवड्यांपूर्वी करण्यात आले होते. मात्र, नालीतून काढलेली संपूर्ण माती आणि गाळ कंत्राटदार व ग्राम प्रशासनाने रस्त्यावरच तसाच ठेवून दिला. गेल्या दोन हप्त्यांपासून ही माती रस्त्यावरच पडून असल्याने रस्ता अरुंद झाला असून, पावसाळ्याच्या दिवसांत चिखल होऊन ज्येष्ठ नागरिक, महिला आणि शाळकरी मुलांना चालणेही कठीण झाले आहे.

या गंभीर समस्येबाबत गावातील जागरूक नागरिकांनी वॉर्ड सदस्य, उपसरपंच आणि थेट सरपंचांकडे वारंवार तक्रारी केल्या. मात्र, आठवडा उलटूनही रस्त्यावरील माती हटवण्यात आली नाही. उलट, या समस्येकडे

## नागरिकांमधून संताप, कारवाईची मागणी

**जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधीच जर अशी अरेरावीची भाषा वापरत असतील, तर दाद मागायची कोणाकडे? असा संतप्त सवाल बोटे गावातील नागरिक विचारत आहेत. या रस्त्यावरील माती तात्काळ हटवून गावकऱ्यांची समस्या दूर करावी आणि संबंधित मुजोर सरपंचांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.**

जाब विचारण्यासाठी गेलेल्या गावकऱ्यांशी सरपंचांनी अत्यंत उर्मटपणे संवाद साधल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अर्जुनी–मोर विधानसभा मतदारसंघात २२ ते २७ जुलैदरम्यान "जनसेवा सप्ताह'

**सडक अर्जुनी :–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते व महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अर्जुनी–मोर विधानसभा मतदारसंघात आमदार इंजि. राजकुमार बडोले यांच्या पुढाकाराने दि. २२ ते २७ जुलै २०२६ या कालावधीत विविध सामाजिक व जनहितकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या जनसेवा सप्ताहाची सविस्तर माहिती आमदार इंजि. राजकुमार बडोले यांनी सडक अर्जुनी येथील आपल्या निवासस्थानी दिली.

# गोंदिया कृषी विभागाची उल्लेखनीय कामगिरी हजारो शेतकऱ्यांना लाभ

**गोंदिया :–** वर्ष २०२५–२६ मध्ये गोंदिया कृषी विभागाने विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. नैसर्गिक आपत्ती, पीक विमा, यांत्रिकीकरण, अन्न प्रक्रिया उद्योग तसेच विविध कृषी योजनांमधून कोट्यवधी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना सुमारे ९८.९४ कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात आली. तसेच पीक विमा योजनेअंतर्गत ३८.५० कोटी रुपयांचा विमा मंजूर करण्यात आला आहे.

पीएम किसान व नमो शेतकरी योजनेद्वारे २,३१,६४४ शेतकऱ्यांना वर्षभरात २१५.९८ कोटी रुपये थेट खात्यात जमा करण्यात आले, ज्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळाले आहे.

यांत्रिकीकरण योजनेत २५५२ लाभार्थ्यांना ३०.३४ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून, आधुनिक शेतीला चालना मिळाली आहे.

अन्न प्रक्रिया उद्योगातही जिल्ह्याने प्रगती केली आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत १९६ लाभार्थ्यांना २.३८ कोटी रुपये अनुदान देण्यात आले. मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजनेत ३२ लाभार्थ्यांना २६.२७ कोटी रुपये अनुदान देण्यात आले.

रब्बी क्षेत्रवाढ मोहिमेत मका ३७५८.८० हेक्टर आणि मोहरी ६७.६० हेक्टर क्षेत्राची नोंद झाली आहे. तसेच महाविस्तार ॲपचा ३१ टक्के शेतकऱ्यांनी वापर केल्यामुळे डिजिटल शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे.

मका पिकाच्या क्षेत्रवाढीसाठी दरवर्षी ५६०० हेक्टरचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, पुढील तीन वर्षांत हे क्षेत्र १६८०० हेक्टरपर्यंत नेण्याचा मानस आहे. यासाठी ४० एफपीओंना अवजारे बँक उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासन व कृषी विभागाच्या समन्वयातून साध्य झालेली ही कामगिरी शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण ठरत असून, आगामी काळातही अशाच योजनांद्वारे कृषी विकासाला गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# फोर्टिफाइड तांदूळ घोटाळा: गोंदियातील दोन राइस मिलर्स एसआयटीच्या जाळ्यात

## एशियन प्लांटचा सूत्रधार, इतर व्यापारी व ट्रान्सपोर्टर अजूनही फरार; एकूण अटक १० वर

**गोंदिया:–** मध्य प्रदेशातील बहुचर्चित फोर्टिफाइड तांदूळ घोटाळ्याची पाळेमुळे आता महाराष्ट्रापर्यंत पोहोचली आहेत. याप्रकरणी विशेष तपास पथकाने (डखढ) गोंदियातील दोन बड्या राइस मिल चालकांना बेड्या ठोकल्या आहेत. मखंडेलवाल राइस मिलफ्चे संचालक किशनलाल खंडेलवाल आणि जुगल खंडेलवाल अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या कारवाईमुळे गोंदिया जिल्ह्यातील इतर राइस मिल चालकांचेही धाबे दणाणले असून, त्यांच्यावरही लवकरच कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

भारतीय अन्न महामंडळाच्या (ऋउख) गोदामातून मएशियन प्लांटफ्च्या नावावर उचललेला फोर्टिफाइड तांदूळ बेकायदेशीरपणे खरेदी करून त्याची उघड्या बाजारात विक्री केल्याचा ठपका खंडेलवाल बंधूंवर ठेवण्यात आला आहे.

**अटकेतील आरोपींची संख्या १० वर**

यापूर्वी एसआयटीने श्री बिहारी राइस मिलचे (नेरता) संचालक बिहारी पटेल, त्यांचे मुनीम अजित विमने, शांती राइस मिलचे संचालक सुरेंद्र राणा आणि विजय राइस मिलचे संचालक गौरव माहेश्वरी यांना अटक केली होती. खंडेलवाल बंधूंच्या अटकेनंतर या घोटाळ्यातील एकूण आरोपींची संख्या आता १० वर पोहोचली आहे.

**मुख्य सूत्रधारासह अनेक जण अजूनही पसार**

या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार आणि मएशियन प्लांटफ्चा संचालक गोविंदा खेडा, फयनान्सशी संबंधित पिता–पुत्र, सिवनी येथील काही राइस मिल चालक व ट्रान्सपोर्टर अजूनही पसार आहेत. पोलीस त्यांचा तीव्रतेने शोध घेत असून लवकरच त्यांना बेड्या ठोकल्या जातील, असा दावा एसआयटीने केला आहे.

**असा झाला कोट्यवधींचा घोटाळा**

काळाबाजार: एफसीआय गोदामातून एशियन प्लांटच्या नावाने फोर्टिफाइड तांदूळ बाहेर काढला जायचा. मात्र, तो ठरलेल्या ठिकाणी न नेता परस्पर विविध राइस मिल्समध्ये उतरवून विकला जात होता. तांदळाच्या या खरेदी–विक्रीचे व्यवहार सिवनीमध्ये झाल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले असून, पोलीस आता या आर्थिक देवाणघेवाणीची कसून चौकशी करत आहेत.

**१२ कोटींपेक्षा अधिक किमतीचा ५ हजार मे. टन तांदूळ जप्त**

एसआयटीने आतापर्यंत १२ कोटींपेक्षा जास्त मूल्याचा ५ हजार मीट्रिक टनाहून अधिक फोर्टिफाइड तांदूळ जप्त केला आहे. याशिवाय तांदळाची बेकायदेशीर वाहतूक करणारे २० हून अधिक ट्रक पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. शासकीय तांदूळ खुल्या बाजारात खपवणाऱ्या या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला असून, येत्या काही दिवसांत आणखी मोठे चेहरे गळाला लागण्याची शक्यता आहे.

# सुकडी-डाकरामच्या विकासासाठी खा. पटेल यांच्याकडे मागण्यांचे निवेदन

**गोंदिया:–** तिरोडा तालुक्यातील सुकळी–डाकराम जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रलंबित विकासकामांना गती मिळावी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न मार्गी लागावेत, या उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तिरोडा तालुका अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य जगदीश (बालू) बावनथडे यांनी ज्येष्ठ नेते व खासदार प्रफुल्ल पटेल यांची भेट घेऊन विविध विकासकामांसंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले.



या भेटीत क्षेत्रातील रस्त्यांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याची न उपलब्धता, ग्रामीण आरोग्य सुविधा, सार्वजनिक बांधकामे आणि इतर पायाभूत सुविधांच्या उभारणीसंदर्भातील प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. सुकळी–डाकराम परिसरातील विकासकामांना प्राधान्य देण्याची आवश्यकता अधोरेखित करत बावनथडे यांनी विविध प्रलंबित प्रस्ताव लवकर मंजूर करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी केली.

खासदार प्रफुल्ल पटेल यांनी निवेदनातील मुद्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित कामांचा आढावा घेतला. नागरिकांच्या हिताशी संबंधित विकासकामे प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी आवश्यकत्या स्तरावर पाठपुरावा विकासासाठी केला जाईल आणि क्षेत्राच्या सर्वांगीण कोणतीही कमतरता ठेवली जाणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिल्याचे बावनथडे यांनी सांगितले. लोकप्रतिनिधींनी

सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करणे आवश्यक मानले जाते. अशा पार्श्वभूमीवर सुकळी–डाकराम परिसरातील पायाभूत सुविधांबाबत पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले असून, या बैठकीनंतर प्रलंबित कामांना प्रत्यक्ष गती मिळते का, याकडे स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

विकासाच्या घोषणांसोबतच त्यांची वेळेत अंमलबजावणी होणे हीच खरी अपेक्षा असल्याची भावना परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## नंगपुरा मुर्ती ग्रामपंचायतच्या ७ सदस्यांच्या अपात्रतेला अखेर मिळाला स्थगनादेश

**गोंदिया :–** जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या तरतुदींनुसार तालुक्यातील नंगपुरा मुर्री ग्रामपंचायतच्या सात सदस्यांना ग्रामपंचायत कराचा भरणा निर्धारित कालावधीत न केल्यामुळे २ जुलै रोजी सदस्यपदासाठी अपात्र घोषित केले होते. हा आदेश सरपंच कविता माधवराव लिचडे यांनी सादर केलेल्या अर्जावर सुनावणी केल्यानंतर पारित करण्यात आला होता; परंतु अपर आयुक्त नागपूर यांनी २० जुलै रोजी या आदेशाला स्थगिती दिली आहे.

अपात्र घोषित केलेल्या सदस्यांमध्ये करण कैलाश टेकाम, रणधीर मदन शहारे,रवी मुकेश बोमचेर, लीना उमेश पारधी, इंद्रकला ओमप्रकाश पारधी, मंदा दुर्गेश भिवगडे, राजेश कापसे या सात ग्रामपंचायत सदस्यांचा समावेश आहे.

# सुसाट रेती टिप्पर ठरताहेत निष्पापांचे काळ !

**गोंदिया :** जिल्ह्यात सध्या रेती माफियांचा धुमाकूळ शिगेला पोहोचला आहे. रस्त्यावरून धावणारे रेतीचे टिप्पर सामान्य नागरिकांसाठी मयमदूतफ ठरत आहेत. ओव्हरलोड आणि सुसाट वेगाने धावणाऱ्या या वाहनांमुळे अपघातांची मालिका सुरूच आहे. मात्र, याकडे महसूल आणि पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे होणाऱ्या प्राणांतिक अपघातात अनेकांना जीव गमवावा लागत आहे. या प्रकारामुळे सामान्य माणसाच्या जीवाची किंमत आहे की नाही? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

जिल्ह्यात रेती तस्करीला उधाण आले आहे. गोंदिया, तिरोडा, सडक अर्जुनी या तीन तालुक्यात अक्षरशः रेती तस्करांचा धुमाकूळ सुरू आहे. तिरोडा तर रेती तस्करीचा हब झाला आहे. यामुळे निर्भीड व राजरोसपणे रेतीचे उत्खनन करून खुलेआम वाहतूक केली जात आहे. या प्रकार जिल्हाभरातील रस्त्यांवर रेती घेवून धावणाऱ्या टिप्पर व ट्रकच्या वर्दळीवरून समजून येतो. शासकीय नियमांनुसार रेती वाहतुकीसाठी वेळेची आणि वजनाची मर्यादा घालून दिली आहे. मात्र,

वास्तवात चित्र अतिशय भयावह आहे. पहाटेपासूनच सुरू होणारी ही जीवघेणी स्पर्धा रात्री उशिरापर्यंत सुरू असते. अरुंद रस्ते आणि लोकवस्ती असलेल्या भागातून हे टिप्पर इतक्या वेगाने धावतात की, पादचारी आणि दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून चालावे लागते. मात्र, या बेलगाम वाहतुकीवर आळा घालण्यासाठी आरटीओ, पोलिस आणि महसूल



## मंत्री महोदय, आता तरी लक्ष द्या !

**रेती माफियांच्या सुसाट टिप्परनी उच्छाद मांडला आहे. यातून होणाऱ्या अपघातात अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेत. पण प्रशासन मात्र सुस्त आहे. अधिकारी सांगतात महात बांधलेले आहेतफ, मग हे हात नक्की कोणी बांधले? असा प्रश्न आता जनता विचारत आहे. जिल्ह्यातील रस्ते आज मडेथ ट्रॅपफबनले आहेत. महसूल विभाग आणि पोलीस यंत्रणा केवळ कागदी घोडे नाचवण्यात व्यस्त आहे. यामुळे महसूल यंत्रणेचा कारभार असलेले मंत्री बावणकुळे व पालकमंत्र्यांनी यात लक्ष देवून या यमदुतांना आवर घालावे, अशी मागणी केली जात आहे.**

विभागाचे भरारी पथक नेमके कुठे असते? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

जिल्ह्यात भरधाव धावणाऱ्या रेती टिप्परमुळे रस्त्यांवर अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये... गेल्या काही दिवसांत अपघातांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून, अनेक निष्पाप नागरिकांना आपले हातपाय गमवावे लागले आहेत. तर काहींना जीव गमवावा लागला आहे. अपघातांचे मुख्य कारण म्हणजे या टिप्परचा बेफाम वेग आणि ओव्हरलोडिंग... रेती वेळेत पोहोचवण्याच्या नादात हे चालक नियमांची पूर्णपणे पायमल्ली करत आहेत. रस्त्यावरील वळणांवर किंवा गर्दीच्या ठिकाणीही वेग कमी न केल्याने समोरील वाहनधारकांना सावरण्याची संधीच मिळत नाही. या अपघातांची

मालिका पाहता आता हे महामार्ग आहेत की मृत्यूचे सापळे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

**राजकीय वरदहस्ताने यंत्रणेचे हात बांधले**

जिल्ह्यात अवैध रेती तस्करीला उधाण आले आहे. या संपूर्ण काळ्या धंद्याला बड्या राजकीय नेत्यांचे संरक्षण असल्याची चर्चा आहे. बहुतांश टिप्पर हे राजकीय नेत्यांच्या किंवा त्यांच्या समर्थकांच्या मालकीचे असल्याने, एखादा प्रामाणिक अधिकारी कारवाई करण्यासाठी पुढे सरसावलाच तर त्याच्यावर दबावतंत्राचा प्रयोग करून मुस्कूटदाबी केली जाते. त्यामुळे राजकीय दबावापोटी अधिकाऱ्यांचे हात बांधले गेले असून, यामुळेच रेती माफियांची मुजोरी वाढली आहे, असे यंत्रणेतील काही सुज्ञ अधिकारीच दबक्या आवाजात बोलत आहेत.

# ओबीसी प्रवर्गासाठी स्वयंरोजगार व उच्च शिक्षणाची सुवर्णसंधी

**गोंदिया :** महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाची सामाजिक व आर्थिक उन्नती साधण्यासाठी महाराष्ट्र इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत विविध महत्त्वाच्या योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा कार्यालयाला उद्दिष्ट प्राप्त झाले असून, अधिकाधिक नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महामंडळ तसेच त्यांच्याकडे कार्यभार असलेल्या १३ उपकंपन्यांमार्फत कृषी संलग्न व्यवसाय, लघुउद्योग, सेवा उद्योग, नवीन उद्योग उभारणी, व्यवसाय वृद्धी आणि उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी अथवा सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

२० टक्के बीज भांडवल योजना ही राष्ट्रीयकृत बँकांमार्फत राबवली जाते. या योजनेत महामंडळाचा २० टक्के, लाभार्थ्याचा ५ टक्के आणि बँकेचा ७५ टक्के असा सहभाग असतो. या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त ५ लाख रुपयांपर्यंत प्रकल्पांना मदत दिली जाते. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असणे आवश्यक आहे.

थेट कर्ज योजना अंतर्गत महामंडळाकडून थेट १ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. हे कर्ज शेतीपूरक किंवा छोट्या व्यवसायांसाठी दिले जाते. कर्जाची परतफेड ४ वर्षांत करावी लागते. वेळेवर परतफेड केल्यास व्याज आकारले जात नाही; मात्र थकबाकी असल्यास ४ टक्के व्याज लागू होते. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपर्यंत आणि वय १८ ते ५५ वर्षे असणे आवश्यक आहे.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना अंतर्गत १ ते १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज बँकेमार्फत दिले जाते. नियमित परतफेड केल्यास १२ टक्क्यांपर्यंत व्याज परतावा अनुदान स्वरूपात मिळतो. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत आणि वय १८ ते ५० वर्षे असावे.

शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना अंतर्गत देशांतर्गत तसेच परदेशातील उच्च शिक्षणासाठी १० ते २० लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. या योजनेतही १२ टक्क्यांपर्यंत व्याज परतावा मिळतो. अर्जदार बारावीमध्ये किमान ६० टक्के गुणांनी उत्तीर्ण असावा, वय १७ ते ३० वर्षे आणि कुटुंबाचे उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असावे.

महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना ही ओबीसी प्रवर्गातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येते. बचत गटांमार्फत चालवल्या जाणाऱ्या उत्पादन व मूल्यवर्धित उद्योगांसाठी ५ ते १० लाख रुपयांपर्यंत कर्जावर १२ टक्क्यांपर्यंत व्याज परतावा दिला जातो. लाभार्थी महिला महाराष्ट्राची रहिवासी, वय १८ ते ६० वर्षे आणि संबंधित बचत गटाची नोंदणी उचठउ केंद्रात असणे आवश्यक आहे.

या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, गोंदिया कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पंतगा चौक, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, गोंदिया येथे असून दूरध्वनी क्रमांक ०७१८२–२३४०३७ तसेच मोबाईल क्रमांक ९६८९१७८७७३ आहे. अधिक माहितीसाठी ु.ीललषवल.ीस या संकेतस्थळाला भेट द्यावी. जिल्हा व्यवस्थापक श्रीमती विशाखा विजय फडणवीस यांनी ओबीसी प्रवर्गातील जास्तीत जास्त नागरिकांनी या योजनांचा लाभ घेऊन स्वयंरोजगार व शिक्षणाच्या संधीचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# ३ लाखांच्या लाच प्रकरणी तिरोड्याचे नगराध्यक्ष अशोक असाटी यांच्यावर गुन्हा दाखल!

**गोंदिया:-** तिरोडा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे डेकोरेशन आणि केटरिंगचे बिल मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात लाखो रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी तिरोडा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अशोक रामजीबाबू असाटी यांच्यासह एका खाजगी इसमावर गोंदिया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (अउइ) गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे गोंदिया जिल्ह्यातील राजकीय वतुर्ळात प्रचंड खळबळ माजली आहे.नगराध्यक्ष अशोक असाटी (वय ५४) आणि त्यांना लाचखोरीसाठी प्रोत्साहित करणारा खाजगी इसम कैलास किसन वाघमारे, अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत.

### बिलाच्या मंजुरीसाठी उजव्या हातावर लिहिली लाचेची रक्कम!

तक्रारदार ६० वर्षीय वृद्धाचा डेकोरेशन व केटरिंगचा व्यवसाय आहे. त्यांनी तिरोडा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ दरम्यान सेवा पुरवली होती. या कामाचे महर्षल केटरिंगफ्चे ७ लाख ७२ हजार आणि मउज्वला डेकोरेशनफ्चे १७ लाख ५० हजार, असे एकूण २५ लाख २२ हजार रुपयांचे बिल त्यांनी नगरपरिषदेत सादर केले होते.या बिलाच्या मंजुरीसाठी तक्रारदार २० मे रोजी नगराध्यक्ष अशोक असाटी यांना भेटायला गेले. तेव्हा असाटी यांनी, ङ्ग१६ लाख रुपये मंजूर होऊ शकतात, त्यापेक्षा जास्त देणार नाही. त्यातूनही तुम्हाला मुख्याधिकारी (उज), ऑडिटर आणि कॅशियर यांना पैसे द्यावे लागतील,ङ्क असे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी, २१ मे रोजी तक्रारदार पुन्हा कार्यालयात गेले असता, नगराध्यक्ष असाटी यांनी चक्क तक्रारदाराच्या उजव्या हातावर ३,२०,०००/- रुपये लिहून एवढ्या लाचेची मागणी केली.

### पडताळणीत लाचखोरी उघड

तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ८ जून



रोजी एसीबी गोंदिया कार्यालयात तक्रार नोंदवली. एसीबीने त्याच दिवशी पंचांसमक्ष लाच मागणी-ची पडताळणी केली. यावेळी नगराध्यक्ष असाटी यांनी १६ लाखांचे बिल काढून देण्यासाठी आधी दिलेल्या ६ लाखांच्या चेकच्या मोबदल्यात १ लाख २० हजार रुपयांची लाच मागितली.

ही रक्कम त्यांचे पीए शुभम भोयर यांच्याकडे देण्यास सांगून, उर्वरित १० लाखांचा चेक मिळाल्यानंतर पुढचे पैसे आणून देण्यास सांगितले. या संपूर्ण प्रक्रियेत खाजगी इसम कैलास वाघमारे याने तक्रारदाराला लाच देण्यासाठी प्रोत्साहित केल्याचे निष्पन्न झाले.

### संशयामुळे हुकला सापळा!

एसीबीने ९ जून रोजी नगराध्यक्ष कार्यालयात लाचेचा सापळा रचला होता. तक्रारदाराला पैसे घेऊन पाठवण्यात आले. मात्र, नगराध्यक्ष अशोक असाटी आणि त्यांचा पीए शुभम भोयर यांना तक्रारदाराच्या हालचालींवर संशय आल्याने त्यांनी ऐनवेळी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केली, ज्यामुळे एसीबीचा थेट रंगेहात पकडण्याचा सापळा हुकला.

### गुन्हा दाखल, घरझडती सुरू

सापळा अयशस्वी ठरला तरी लाच मागणीच्या पडताळणीत ठोस पुरावे मिळाल्याने अखेर १८ जुलै रोजी सकाळी १०:४३ वाजता तिरोडा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ आणि १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. आर-ोपी नगराध्यक्ष अशोक असाटी यांना ताब्यात घेऊन नवीन फौजदारी कायद्याच्या (BNSS) कलम ३५(३) अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. सध्या आरोपीच्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई लाप्रवि ना-गपूर परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक डॉ. दिगंबर प्रधान, अपर पो-लीस अधीक्षक श्रीमती माधुरी बाविस्कर, आणि अपर पोलीस अधीक्षक विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक निलेश लोधी, पोलीस निरीक्षक उमाकांत उगले आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

### लाच मागणाऱ्यांची गय केली जाणार नाही: ACB चे आवाहन

शासकीय काम करण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त कोणत्याही अधिकारी, कर्मचारी किंवा खाजगी एजंटने लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खासदार, आमदारांच्या घरासमोर ओबीसींचे 'ढोल बजाओ' आंदोलन




**भंडारा :-** ओबीसी समाजाच्या विविध न्याय व प्रलंबित मागण्यांसाठी ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने ११ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू आहे. परंतु, अद्यापही मागण्या व समस्या न सुटल्याने १९ जुलै रोजी ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने जिल्ह्यातील सर्व खासदार आमदारांच्या घरासमोर मढोल, डफफळ्या बजाओफ आंदोलन केले. मागण्यांचे निवेदन सोपवित संसद व विधानसभेत ओबीसींचा आवाज बुलंद करण्याची अपेक्षा व्यक्त केली. व

केंद्र शासनाद्वारे प्रसिद्ध झालेल्या जनगणनेसंबंधीच्या राजपत्रात एससी, एसटी व इतर असा जनगणनेत उल्लेख आहे. परंतु, ओबीसींचा स्वतंत्र कॉलम नसल्याने ओबीसींची जनगणना होणार नाही, हे सिद्ध होत असून जाणीवपूर्वक अन्याय करण्यात येत आहे. त्यामुळे ओबीसी संघर्ष समितीतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ७० दिवसांपासून बेमुदत साखळी उपोषण सुरू आहे. ओबीसी समाजात असंतोषाचे वातावरण आहे. संसदेत, विधानसभेत ओबीसींचा मुद्दा उपस्थित करून राजपत्रात ओबीसींचा स्वतंत्र कॉलम व होणारा अन्याय दूर करण्याबाबत सहकार्य करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

आंदोलनात ओबीसी संघर्ष समितीचे प्रमुख समन्वयक सदानंद इलमे, मुख्य समन्वयक प्रभाकर वैरागडे, मुख्य समन्वयक भगीरथ धोटे, समन्वयक संजय मते, समन्वयक डॉ. बाळकृष्ण सार्वे, रोशन उरकुडे, गोपाल सेलोकर, संघटक रमेश शहारे, के. झेड. शेंडे, गोपाल सेलोकर, मंगला वाडिभस्मे, नेपाल चिचमलकर, सुभाष ऊके, श्रीकांत मस्के, केशव हुड, चंद्रशेखर गिरड, योगेश शेंडे, वामनराव गोंधोळे, ललिता देशमुख, शुभदा झंझाड, वृंदा गायधने, प्रा. जयंत झोडे, उमाजी देशमुख, माधवराव भोयर, नरेंद्र वाडिभस्मे, गोपाल ठवकर, मोरेश्वर सार्वे व मोठ्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते.

### भर पावसात यांच्या घरासमोर वाजविले ढोल

**रविवारला दुपारपासून पावसाला प्रारंभ झाला. परंतु, पावसाची तमा न बाळगता ओबीसी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी खा. डॉ. प्रशांत पडोळे, आ. नरेंद्र भोंडेकर, आ. राजू कारेमोरे, आ. नाना पटोले यांच्या साकोली येथील जनसंपर्क कार्यालयासमोर, आ. परिणय फुके यांच्या लखानी येथील घरासमोर तर नवनिर्वाचित आ. अविनाश ब्राम्हणकर यांचा सालेबर्डी येथे सत्कार करीत त्यांच्या घरासमोर ढोल व पारंपारिक डफफळ्या वाजविल्या. निवेदन देत चर्चा केली.**

### प्रमुख मागण्या

**ओबीसींची जातिनिहाय जनगणना करावी. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन आर्थिक संकटातून मुक्त करावे. लोकसंख्येच्या प्रमाणात निधी वाटप करण्यात यावा. विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती लागू करावी. ममहाज्योतीफ संस्थेला ओबीसी विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी १००० कोटींचा निधी उपलब्ध करावा. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शिक्षक भरती करावी.**

# ९९ हजार २०२ शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान; २० हजार ९० शेतकऱ्यांचे ५ कोटींचे व्याज माफ

**गोंदिया :-** राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्जमाफीची घोषणा केली आहे. या कर्जमाफीस जिल्ह्यातील २० हजार ९१५ शेतकरी पात्र ठरले असून या शेतकऱ्यांचे १३० कोटी रुपयांचे कर्ज माफ केले जाणार आहे. कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास विलंब होत असल्याने शासनाने या शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे २० हजार ९१५ शेतकऱ्यांचे ५ कोटी रुपयांचे व्याज माफ करण्यात आले आहे.

महायुती सरकारने १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा केली. तसेच यापूर्वी महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनासुद्धा या योजनेचा लाभदेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी जिल्ह्यातील एकूण २० हजार ९१५ शेतकरी पात्र ठरले आहेत. या शेतकऱ्यांचे एकूण १३० कोटी रुपयांचे कर्ज थकीत होते. हे कर्ज आता माफ होणार आहे. कर्जमाफीची रक्कम अद्यापही पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली.नसल्याने त्यांच्या थकीत कर्जाच्या रकमेवर व्याजाची आकारणी सुरूच आहे. शिवाय या शेतकऱ्यांना नवीन कर्जाची उचल-सुद्धा करता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली होती. यावर शासनाने कर्जमाफीस मात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

### कर्जमाफीस पात्र ठरलेले तालुकानिहाय शेतकरी

| तालुका | शेतकरी |
|---|---|
| आमगाव | १६३२ |
| अर्जुनी मोरगाव | ३६५० |
| देवरी | २७१४ |
| गोंदिया | २९३१ |
| गोरेगाव | ३६६७ |
| सडक अर्जुनी | २५७५ |
| सालेकसा | ८८२ |
| तिरोडा | ३२३८ |

### आधार प्रमाणीकरणानंतरच्च रक्कम जमा होणार

**जिल्ह्यातील एकूण २० हजार २१५ शेतकरी कर्जमाफीस पात्र ठरले आहेत. या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्याची प्रक्रिया येत्या तीन-चार दिवसांत सुरू केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी जिल्ह्यात किती सेतू केंद्र आहेत याची माहिती घेणे सुरू आहे. आधार प्रमाणीकरणानंतर शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा केली जाणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील २० हजार ९१५ शेतकऱ्यांच्या कर्जावरील ५ कोटी रुपयांचे व्याज माफ केले जाणार असल्याची माहिती सहकार उपनिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.**

### ९९ हजार २०२ शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान

**शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचेप्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी जिल्ह्यातील ९९ हजार २०२ शेतकरी पात्र ठरले आहे. या शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरच रक्कम जमा केली जाणार असल्याची माहिती आहे.**

(पान १ वरुन)

यावेळी आंदोलनाच्या मागण्या आणि पुढील भूमिका यावर दोघांमध्ये संवाद झाला. भेटीदरम्यान अभिजित दिपके यांनी आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांची माहिती शरद पवार यांना दिली. सोनम वांगचुक यांच्यावर उपचार सुरू असून त्यांना ताब्यात ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच दिल्ली आणि मुंबई येथील आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवरील सर्व गुन्हे मागे घेण्यात यावेत, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, आंदोलनादरम्यान आत्महत्या केलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची मदत द्यावी आणि देशभरातील आंदोलकांविरोधात दाखल करण्यात आलेले सर्व एफ आयआर मागे घेण्यात यावेत, अशा चार प्रमुख मागण्या त्यांनी मांडल्या. यावर शरद पवार यांनी महाराष्ट्र राज्यातील सुमारे ३० महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये कोणतेही आवाहन न करता आंदोलन झाल्याचा उल्लेख केला.

आंदोलनकर्त्यांना कोणत्या प्रकारच्या मदतीची गरज आहे आणि हे आंदोलन आणखी किती दिवस सुरू ठेवण्याचा विचार आहे, असे प्रश्न त्यांनी अभिजित दिपके यांना विचारले. त्यावर उत्तर देताना दिपके यांनी आपण मागील ३१ दिवसांपासून जंतर-मंतरवर आंदोलन करत असल्याचे सांगितले.

सोमवारी घडलेल्या घटनेनंतर सरकारविषयी नाराजी वाढल्याचेही त्यांनी नमूद केले. आंदोलनाचा उद्देश केवळ धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणे हा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# गोंदिया जिल्ह्यात "महसूल जनकल्याण शिबिरे' २२ जुलैपासून

गोंदिया:- महसूल व वन विभागाच्या पुढाकारातून गोंदिया जिल्ह्यात २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत "महसूल जनकल्याण शिबिरे" आयोजित करण्यात येणार असून, नागरिकांच्या प्रलंबित महसुली कामांचा तत्काळ निपटारा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

# टेमणी जिल्हा परिषद शाळेतील भांडारगृहाचे काम निकृष्ट; सरपंचांसह उपसरपंचांवर भ्रष्टाचाराचे आरोप



**गोंदिया:-** जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि दर्जेदार इमारती बांधण्याचे शासनाचे कडक नियम असताना, गोंदिया तालुक्यातील टेमणी येथे मात्र एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील जिल्हा परिषद शाळेत नव्याने बांधण्यात आलेल्या भांडारगृहाचे (डीश ठै) काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार शाळा व्यवस्थापन समितीने केली आहे. या बांधकामात मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत, समितीचे अध्यक्ष नरेश परिहार यांनी जिल्हा प्रशासनाकडे चौकशीची मागणी केली असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी लावून धरली आहे.

### १० ऐवजी केवळ ४ कॉलमवर उभी केली इमारत!

मिळालेल्या माहितीनुसार, टेमणी येथील जिल्हा परिषद शाळेत लाखो रुपये खर्च करून हे नवे भांडारगृह बांधण्यात आले आहे. नियमांनुसार या इमारतीचे बांधकाम तब्बल १० कॉलम (खांब) उभारून करणे बंधनकारक होते. मात्र, या कामाचे कंत्राट घेतलेल्या स्थानिक सरपंच, उपसरपंच आणि त्यांच्या एका कार्यकर्त्याने नियमांना केराची टोपली दाखवत केवळ ४ कॉलमवरच अख्खी इमारत उभी केल्याचा गंभीर आरोप शाळा व्यवस्थापन समितीने केला आहे.

### सुशोभीकरणाआड निकृष्ट दर्जा लपवण्याचा प्रयत्न

इमारतीचे बांधकाम आ-तून पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे झाले असून, ते वरून चांगले दिस-ावे म्हणून केवळ रंगरंगोटी आणि सुशोभीकरण करून प्रशास-नाची दिशाभूल करण्यात आली आहे, असा थेट आरोप अध्यक्ष नरेश परिहार यांनी केला आहे. दरम्यान, या निकृष्ट बांधकामामुळे भविष्यात शाळेतील निष्पाप लहान मुलांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, कोणतीही मोठी दुर्घटना घडू शकते अशी भीती व्यक्त केली जात आहे. "भविष्यात जर काही अघटीत घडले, तर याला बांधकाम करणारे सरपंच, उपसरपंच आणि संबंधित कनिष्ठ अभियंता जबाबदार राहतील का?" असा संतप्त सवाल परिहार यांनी उपस्थित केला आहे.

### देयके रोखली; आंदोलनाचा इशारा

या घोटाळ्याची कुणकुण लागताच, सदर इमारतीची आधी मंजूर झालेली देयके (इळश्रश्री) वगळता, उर्वरित अंतिम देयके चौकशी पूर्ण होईपर्यंत रोखून धरण्यात आल्याची माहिती शाळा व्यवस्थापन समितीने दिली आहे. शिक्षण विभागाने या संपूर्ण प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करावी, अन्यथा टेमणी ग्रामपंचायतीसमोर तीव्र उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे. या प्रकरणामुळे गोंदियातील शिक्षण आणि बांधकाम वतुर्ळात एकच खळबळजण उडाली आहे.

# पात्र लाभार्थ्याला योजनांचा लाभ द्या-राजेंद्र जैन



**गोंदिया :-** जिल्ह्यातील नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे लाभ घेता यावा याकरिता महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी शिबिराचा आराखडा तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. तसेच नागरिकांपर्यंत पोहोचून प्रचार व प्रसार करावा ज्यामुळे कोणताही लाभार्थी वंचित राहणार नाही. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ देण्याचे निर्देश खा. राजेंद्र जैन यांनी दिले.

स्थानिक प्रशासकीय इमारत येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्याकरिता शनिवारी (दि.१८) आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी चंद्रकांत खंडाईत, तहसीलदार समशेर खान पलापण त मटमल विभागाने अधिकारी व सुरेश हर्षे, केतन तुरकर, नानू मुदलियार, राज शुक्ला, लोकेश यादव, रवी पटले यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन करण्यात येत असून राज्य शासनाने महसूल विभाग लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्यासाठी तसेच तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत या महसूल विभागाच्या योजनांचा लाभ घेता यावा गा टेनने प्रछत्रपती शितात्ती मटागन महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबवित आहे. या शिबिराचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत खा. राजेंद्र जैन यांनी नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी व शासनाच्या विविध योजना, शेतकरी, महिला, व निराधारांना योजनेच्या लाभमोठ्या प्रमाणात मिळावा या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना केल्या. यासाठीच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत १ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात शिबिर आयोजित केली जात असल्याचे गातेली त्यांनी सांगितले

# ओबीसी विद्यार्थ्यांचा छळ: शैक्षणिक सत्र सुरू, पण शासकीय वसतिगृहांची प्रवेश प्रक्रिया रखडली!




"राज्य सरकारकडे आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे वसतिगृहे पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. मंत्रालय पातळीवरून यावर अंतिम निर्णय होताच तातडीने ऑनलाइन अर्ज मागवण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल."
विजय वाकुडकर
उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण, नागपूर विभाग.

**गोंदिया:-**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गाजतवाजत सुरू केलेल्या ओबीसी, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील (तगछढ-डइउ) विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाचा पुरता बोजवारा उडाला आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७ सुरू होऊन महिना उलटला, तरी अद्याप राज्य सरकारने प्रवेश प्रक्रियाच सुरू न केल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष पस-रला आहे. परिणामी, मओबीसींचा डीएनएफ असल्याचा दावा करणाऱ्या महायुती सरकारच्या भूमिकेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### 'आधार' योजनेचेही वेळापत्रक रखडले

**वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळणाऱ्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने मज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनाफ आणि मपंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनाफ सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना घरभाडे आणि इतर शैक्षणिक खर्चासाठी थेट आर्थिक मदत दिली जाते. परंतु, यंदा वसतिगृह प्रवेश आणि मआधारफ योजना या दोन्ही प्रक्रियेचे अर्ज मागवण्याचे वेळापत्रक सरकारने अजून जाहीर केलेले नाही. त्यामुळे विद्यार्थी चक्रावून गेले आहेत.**

### ७२ पैकी तब्बल १८ वसतिगृहे अजूनही कागदावरच!

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण ७२ शासकीय वसतिगृहे (प्रत्येक जिल्ह्यात मुला-मुलींसाठी प्रत्येकी १) मंजूर करण्यात आली आ-हेत. मात्र, दोन वर्षे उलटूनही सरकार सर्व वसतिगृहे सुरू करू शकलेले नाही. सध्या राज्यातील ५६ (काही नोंदीनुसार ५४) वसतिगृहेच प्रत्यक्षात सुरू आ-हेत, तर उर्वरित १८ वसतिगृहे प्रशासकीय अनास्थेमुळे अद्यापही बंद आहेत.

शैक्षणिक सत्र सुरू झाल्यामुळे ग्रामीण भागातून शहरात आलेल्या गरीब ओबीसी विद्यार्थ्यांना हक्काचा निवारा मिळालेला नाही. त्यामुळे आर्थिक परिस्थिती नसतानाही अनेक विद्यार्थ्यांना खासगी खोल्या किंवा लॉज भाड्याने घेऊन राहण्याची वेळ आली आहे. ओबीसी संघटनांकडून वारंवार या प्रश्नाकडे लक्ष वेधले जात असूनही, शासन निर्णय घेण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप होत आहे.

**विभागनिहाय मंजूर वसतिगृहांची स्थिती**

| विभाग | समाविष्ट जिल्हे | मुलांची वसतिगृहे | मुलींची वसतिगृहे | एकूण |
|---|---|---|---|---|
| नागपूर | नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली | ६ | ६ | १२ |
| अमरावती | अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ | ५ | ५ | १० |
| छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर, धाराशिव | ८ | ८ | १६ |
| नाशिक | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर | ५ | ५ | १० |
| पुणे | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर | ५ | ५ | १० |
| कोकण | मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | ७ | ७ | १४ |
| एकूण | ३६ जिल्हे | ३६ | ३६ | ७२ |

# एकनिष्ठा व मेहनत हेच माझ्या यशाचे गमक-खासदार राजेंद्र जैन

**गोंदिया:-**गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचलित नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालय, डी. बी. सायन्स महाविद्यालय, एस. एस. गर्ल्स महाविद्यालय व पी. पी. एज्युकेशन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नवनिर्वाचित खासदार तथा गोंदिया शिक्षण संस्थेचे सचिव राजेंद्र जैन यांचा कौटुंबिक सत्कार समारंभ एन. एम. डी. महाविद्यालयाच्या अत्याधुनिक सभागृहात उत्साहात पार पडला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्कारमूर्ती खासदार राजेंद्र जैन होते. प्रमुख अतिथी म्हणून देवेंद्रनाथ चौबे उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. रवींद्र मोहतुरे, प्राचार्य डॉ. मनोज पटले, प्राचार्या डॉ. शारदा महाजन व प्राचार्य डॉ. राजेंद्र निकोसे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी स्व. मनोहरभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन व शारदास्तवनाने करण्यात आली.

सत्कार सोहळ्यात बोलतांना खासदार राजेंद्र जैन म्हणाले की, "एन.एम.डी. महाविद्यालयात इयत्ता अकरावीचा विद्यार्थी म्हणून शिक्षण घेण्याचे भाग्य मला लाभले. आज त्याच महाविद्यालयात माझा सत्कार होत असल्याने हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि भावनिक क्षण आहे." ते पुढे म्हणाले की, शिक्षा महर्षी स्व.मनोहरभाई पटेल यांचे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्य माझ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. खासदार प्रफुल पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रामाणिकपणा, एकनिष्ठा आणि अथक परिश्रमाने कार्य करत आलो असून, "एकनिष्ठा आणि मेहनत हेच माझ्या यशाचे खरे गमक आहे," असे त्यांनी सांगितले.

गोंदिया शिक्षण संस्थेतील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांकडे स्वतःच्या मुलांप्रमाणे पाहून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचे आवाहन केले.प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. रवींद्र मोहतुरे यांनी राजेंद्र जैन यांच्या कार्याचा आढावा घेतला. प्राचार्या डॉ. शारदा महाजन यांनी आपल्या मनोगतात राजेंद्रजी जैन यांचे यश संपूर्ण गोंदिया शिक्षण संस्था परिवारासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून, राष्ट्रीय राजकारणात त्यांना अधिक यश लाभावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मोहम्मद एजाज शेख यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. मनोज पटले यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयांतील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) व राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी)चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.